महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ. दा.नौ. मार्ग, मुंबई- ४०० ००१,

दूरध्वनी क्र.०२२- २२६२०२३१/३२, **Email : higherartexam@gmail.com**

---

क्रमांक :डिओए/एचएई-२०२०/चार/३३० दिनांक : १७/०३/२०२०

---

अत्यंत तातडीचे

प्रति,

१) अधिष्ठाता, सर ज.जी. कला महाविद्यालय, मुंबई.
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद.
४) प्राचार्य, सर्व शासनमान्य अशासकीय कला महाविद्यालये.

विषय : राज्यात करोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.

संदर्भ : १) शा.उ.प. २०२० च्या परीक्षांचे दिनांक ०६/०३/२०२० रोजीचे वेळापत्रक.
२) या कार्यालयाचे पत्र क्र.एचएई-२०२०/चार/३०२, दिनांक १२/०३/२०२०.
३) शासन पत्र क्र. संकिर्ण -२०२०/प्र.क्र.६०/२०/तांशि-१, दिनांक १६ मार्च, २०२०

शासकीय उच्चकला परीक्षा २०२० च्या पदविका/प्रमाणपत्र परीक्षांचे संदर्भीय क्र. १ अन्वये वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. तसेच संदर्भीय क्रमांक २ अन्वये प्रश्नपत्रिका व परीक्षा साहित्य स्विकारण्याबाबतचे दिनांक घोषीत करण्यात आले आहेत. तथापि, संदर्भीय क्रमांक ३ वरील शासन पत्रान्वये करोना विषाणूचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अशासकीय कला संस्था/महाविद्यालये दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत सुचित करण्यात आले असून दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत आयोजित करण्यात येणा-या सर्व परीक्षा व प्रात्याक्षिके रद्द करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले संदर्भी-य क्रमांक १ वरील परीक्षेचे वेळापत्रक व क्र. २ वरील साहित्य वितरणाबाबतचे पत्र रद्द करण्यात येत आहे.

तथापि, मौखिक व प्रात्यक्षिक परीक्षेतील विषयांचा विचार करता तसेच पूर्वतयारीकरीता नियोजित परीक्षेच्या वेळापत्रकामध्ये तसेच प्रश्नपत्रिका व साहित्य वितरण कार्यक्रमाच्या दिनांकामध्ये आवश्यक ते बदल करण्यात येत असून सुधारीत वेळापत्रक कला संचालनालयाच्या संकेतस्थळावर लवकरच जाहीर करण्यात येईल. तरी संबधीत कला महाविद्यालयांनी याबाबतची नोंद घ्यावी.

(राजीव मिश्रा)
प्र. कला संचालक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

प्रत,

१) मा. उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग (तांशि-१), मंत्रालय, मुंबई.
२) निरिक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) सहाय्यक निरिक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर/औरंगाबाद.
४) निवड नस्ती.